**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज केरळमध्ये विविध विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण

- नेताजी सुभाषचंद्र बोस आणि शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली

- सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन वैयक्तिक पुरस्कारासाठी यंदा लेफ्टनंट कर्नल सीता अशोक शेळके यांची निवड

- जागतिक आरोग्य संघटनेतून अमेरिका औपचारिकरीत्या बाहेर

**आणि**

- रणजी क्रिकेट स्पर्धेत हैद्राबादविरुद्ध मुंबईचा ५३३ धावांचा डोंगर/ सर्फराज खानचं द्विशतक

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केरळमध्ये विविध विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. रेल्वे जोडणी, शहरी रोजगार, विज्ञान-तंत्रज्ञान, नागरिककेंद्री सेवा आणि अत्याधुनिक आरोग्य सुविधांशी संबंधित प्रकल्पांचा यात समावेश आहे. यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित केलं आणि केंद्र सरकारनं गेल्या ११ वर्षांमध्ये विविध समाजघटकांसाठी सुरू केलेल्या योजनांचा उल्लेख केला. यावेळी तीन अमृत भारत रेल्वेगाड्या आणि एका प्रवासी रेल्वेला प्रधानमंत्र्यांनी हिरवा झेंडा दाखवला. तसंच पीएम स्वनिधी क्रेडिट कार्ड्सचं अनावरण आणि एक लाख फेरीवाल्यांना पीएम स्वनिधी कर्जांचं वाटपही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. या योजनांविषयी ते म्हणाले…

***होल्ड… बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

सीएसआयआर टेक्नॉलॉजी हब आणि रेडिओसर्जरी केंद्राची पायाभरणीही मोदी यांनी केली. याशिवाय, पूजाप्पुरा इथल्या मुख्य टपाल कार्यालयाचं उद्घाटन केलं. कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी भव्य रोडशो केला.

**<><><><><>**

येत्या दीड वर्षात स्वदेशी नाममुद्रेचे मोबाइल फोन भारतात उपलब्ध होतील, असा विश्वास केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला. ते दावोस इथे जागतिक आर्थिक मंचाच्या पार्श्वभूमीवर बातमीदारांशी बोलत होते. भारताकडे चांगली इलेक्ट्रॉनिक्स परिसंस्था असून तिच्या आधारे स्वतःचा मोबाइल फोन ब्रँड निर्माण करण्याची वेळ आता आली आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

दावोसमध्ये आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राने ३० लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले असून, आणखी १० लाख कोटींच्या गुंतवणूक करारांची प्राथमिक बोलणी पूर्ण झाली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यातून ४० लाख रोजगारनिर्मितीचं उद्दिष्ट साध्य होणार आहे असं त्यांनी सांगितलं. राज्यातल्या माध्यमांच्या प्रतिनिधींशी दावोस इथून दूरस्थ माध्यमातून त्यांनी काल संवाद साधला, नवी मुंबई विमानतळाच्या जवळ टाटा समुहाच्या मदतीनं नवोन्मेष शहर उभारलं जाणार आहे. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रासह राज्याच्या सर्वच भागात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जाणार आहे असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२९ व्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली आहे. नेताजींची जयंती पराक्रम दिवस म्हणून साजरी केली जाते. नेताजींचा वारसा प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायक असल्याचं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. साहस, बलिदान आणि राष्ट्रीय एकता या आदर्श गुणांसाठी नेताजी स्मरणात राहतील, असं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात नमूद केलं आहे.

अदम्य साहस, दृढ संकल्प, निर्भय नेतृत्व तसंच अखंड राष्ट्रभक्ती यासाठी नेताजी नेहमीच स्मरणात राहतील, असं प्रधानमंत्री मोदी यांनी म्हटलं आहे. नेताजींच्या सन्मानार्थ देशभर सुरु करण्यात आलेल्या उपक्रमांचा उल्लेख त्यांनी केला.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचं नाव नुसतं ऐकलं तरी देशबांधवांच्या हृदयात राष्ट्रभक्तीची भावना दाटून येते, असं सांगत केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनीही नेताजींना श्रद्धांजली वाहिली आहे. युवा वर्गानं नेताजींचा जीवनपट आणि पराक्रम

जाणून घ्यावा आणि स्वतःची संकल्पशक्ती दृढ करण्यासाठी त्याचा वापर करावा, असं आवाहन शाह यांनी केलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी  आज शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय परिदृश्याला आकार देणाऱ्या बाळासाहेबांचं जनतेशी अनोखं नातं होतं, विविध मुद्द्यांवर ते आपली मतं निडरपणे व्यक्त करत असत, असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना उद्धव  बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबियांनी  आज दक्षिण मुंबईतल्या  ठाकरे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी शिवसेनेचे आजी माजी  नेते आणि कार्यकर्ते उपस्थित  होते.

<><><><><>

केंद्र सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या सुभाषचंद्र बोस आपदा प्रबंधन वैयक्तिक पुरस्कारासाठी यंदा लेफ्टनंट कर्नल सीता अशोक शेळके यांची निवड झाली आहे. केरळमधे वायनाड इथं २०२४ मधे भूस्खलनामुळे ओढवलेल्या आपत्तीत शेळके यांनी अभियांत्रिकी कौशल्याच्या सहाय्याने बचाव कार्यात लक्षणीय योगदान दिलं होतं. मूळच्या अहिल्यानगरच्या सीता शेळके भारतीय सैन्याच्या मद्रास अभियांत्रिकी आस्थापनेत कार्यरत आहेत. ५ लाख रुपये आणि मानपत्र असं पुरस्काराचं स्वरुप आहे. संस्थांसाठीचा ५१ लाख रुपयांचा पुरस्कार यंदा सिक्किम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला देण्यात येणार आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जातो.

<><><><><>

जागतिक आरोग्य संघटनेतून बाहेर पडण्याची घोषणा अमेरिकने केली आहे. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो आणि आरोग्यमंत्री रॉबर्ट केनेडी यांनी संयुक्त निवेदन जारी करुन हा निर्णय जाहीर केला. अकार्यक्षम नोकरशाही आणि कोविड १९ महामारीदरम्यानचं ढिसाळ व्यवस्थापन यामुळे संघटनेचा मूळ उद्देश मागे पडल्याची टीका निवेदनात केली आहे. अनेक अमेरिकन नागरिकांचे प्राण वाचले असते अशी महत्त्वाची माहिती 'हू'ने वेळच्या वेळी दिली नाही असा आरोप अमेरिकेने केला आहे.

या निर्णयाबरोबर अमेरिकेकडून ‘हू’ला मिळणारं अर्थसहाय्य पूर्णपणे थांबेल.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी २५ जानेवारीला सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३०वा भाग असेल.

<><><><><>

संशोधन आणि नवोन्मेषाद्वारे संपूर्ण भारतीय बनावटीची, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यंत्रणा तयार करण्यासाठी भारतीय लष्करानं बेंगळुरूच्या भारतीय विज्ञान संस्थेशी सामंजस्य करार केला आहे. डिजिटल माहिती क्षेत्रात येणाऱ्या नव्या आव्हानांचा सामना करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा उभारण्याचा या कराराचा उद्देश आहे. हा करार म्हणजे देशाला आत्मनिर्भर करायच्या लष्कराच्या वचनबद्धतेचं प्रतीक आहे, असं लष्करानं समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

गोवा नाईट क्लब आग प्रकरणी त्या क्लबच्या मालकांविरुद्ध आर्थिक गैरव्यवहाराचा गुन्हा दाखल केल्यावर सक्तवसुली संचालनालयानं आज गोवा, दिल्ली आणि हरियाणात छापे टाकले. क्लबचे मालक सौरभ आणि गौरव लूथरा आणि सहमालक अजय गुप्ता यांची कार्यालयं आणि घरं, तसंच गोव्यातल्या अरपोरा गावाचे सरपंच रोशन रेडकर आणि पंचायत सचिव रघुवीर बागर यांची कार्यालयं आणि घरांमध्ये ईडीनं तपास केला.

<><><><><>

रणजी चषक क्रिकेट स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यातल्या पहिल्या सामन्यात मुंबई विरुद्ध हैद्राबाद सामना काल हैद्राबादला सुरु झाला. प्रथम फलंदाजी करताना मुंबईने आज दुसऱ्या दिवशी उपाहारापर्यंत ८ गडी बाद ५३३ धावा केल्या आहेत. मुंबईच्या सर्फराझ खान ने अवघ्या २०६ चेंडूत द्विशतक झळकावलं प्रथम श्रेणी क्रिकेटमधलं हे त्याचं पाचवं द्विशतक आहे. अखेर २२७ धावांवर तो बाद झाला.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला दूसरा सामना आज रायपूरमध्ये होणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना भारतानं जिंकला आहे.  सामना संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल.

**<><><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये, काल रात्री वडोदऱ्यात झालेल्या लीग-स्टेज सामन्यात गुजरात जायंट्सनं, यूपी वॉरियर्जवर ४५ धावांनी विजय मिळवला. गुजरात जायंट्सनं दिलेलं १५४ धावांचं लक्ष्य पार करताना यूपी वॉरियर्ज संघ केवळ १०८ धावांचं करू शकला.

**// <><><><><>//**